# Fr. Agnel School

Waliv, Vasai (E)

**Std.: IX** **I Unit test** **Sub : Marathi** **Marks: 40**

---

**कृती १) पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृती पूर्ण करा.** **(2)**

शिरीष आल्यावर लेखकांनी त्याला विचारलेले चार प्रश्न

↓ ↓ ↓ ↓

समारंभाचा दिवस उगवला आणि सकाळपासून शिरीष च्या आठवणीने मी उगाचच बेचैन झालो होतो. सकाळची इतर कामे आटपून मी जरा स्वस्थ बसतो न बसतो तोच दारात शिरीष उभा! मी ताडकन उभा राहिलो व त्याच्याजवळ गेलो.

'अरे, तुझा पत्ता तरी काय? आणि आज एकटाच कसा काय? नाना कासे नाहीत बरोबर? इकडची दुनिया तिकडे होईल ना?

'इकडची दुनिया तिकडेच झाली आहे सर. यापुढे मी एकटाच दिसेन! माझे नाना...नाना.... माझे नाना कायमचे गेले हो सर!'

बऱ्याच सांत्वनानंतर त्याने विचारले, 'आज आपल्या विद्‌यालयाचा कार्यक्रम ना?' मी 'हो' म्हणालो!

**२) कारण लिहा.** **(1)**

i) शिरीषची इकडची दुनिया तिकडे झाली होती कारण....

**३) 'अस्वस्थ होणे' यासाठी उताऱ्यात आलेला वाक्प्रचार शोधून लिहा.** **(1)**

**४) स्वमत.** **(3)**

शिरीषमधील तुम्हाला समजलेली गुणवैशिष्टे सोदाहरण स्पष्ट करा.

**कृती २) (अ) पुढील कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) कोण ते लिहा.** **(2)**

i) कळस चढवणारे –

ii) पाया रचणारे –

iii) खांब होणारे –

¡v) भिंती उभारणारे –

संतकृपा झाली।
इमारत फळा आली।।१।।

ज्ञानदेवें रचिला पाया।
उभारिलें देवालया।।२।।

नामा तयाचा किंकर।
तेणें रचिलें तें आवार।।३।।

जनार्दन एकनाथ।
खांब दिधला भागवत।।४।।

तुका झालासे कळस।
भजन करा सावकाश।।५।।

बहिणी म्हणे फडकती ध्वजा।
निरूपणा केलें बोजा।।६।।

**२) एका वाक्यात उत्तर लिहा.** **(1)**

¡) संत एकनाथांच्या गुरुंचे नाव लिहा.

**३) पुढील शब्दांचे अर्थ लिहा.** **(2)**

¡) ध्वजा - ¡¡) फळा आली –

¡¡¡) देवालय - ¡v) निरूपण –

**४) 'तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ||' या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.** **(2)**

**ब) खालील कवितेचे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे रसग्रहण करा.** **(8)**

**कविता - 'भेटीलागी जीवा'**

**मुद्दे :-**

१) कवितेचे कवी –

२) कवितेचा विषय –

३) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे –

४) कवितेतून मिळणारा संदेश –

५) पुढील शब्दांचे अर्थ लिहा.

¡) लेकी - ¡¡) माऊली –

¡¡¡) श्रीमुख - ¡v) आस -

**कृती ३) पुढील कृती सोडवा. (कोणतेही २)** **(4)**

१) 'काझीरंगा ही कर्दमभूमी आहे' हे विधान स्पष्ट करा.

२) ‘तुम्ही केलेला जंगलप्रवास’ याविषयी थोडक्यात माहिती लिहा.

३) टिप लिहा – वैजयंती

**कृती ४) (अ) खालील ओळींमधील उपमेय, उपमान, समान धर्म, साधार्म्यवाचक शब्द व अलंकार ओळखून लिहा.** **(4)**

१) राधाचा आवाज कोकिळेसारखा मधुर आहे.

२) झरा जणू वाजवी सारंगी रानात.

**ब) खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** **(4)**

१) रवाना होणे –

२) टेकीला येणे –

३) नवल वाटणे -

**क) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(2)**

१) सज्जन ×    २) रात्र ×

३) हजर ×    ४) पौर्णिमा

**कृती ५) पुढील लेखनप्रकारांपैकी कोणतीही १ कृती सोडवा.** **(4)**

**i) प्रसंगलेखन**

★ गावची जत्रा




**ii) आत्मवृत्त**

★ मी क्रीडांगण बोलतोय

पूर्वीचा आनंद – महत्व – क्रीडांगणापेक्षा टीव्ही/मोबाईलचा प्रभाव – क्रीडांगणावर अतिक्रमण – आजची स्थिती – खंत.